सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
शिवाजी विद्यापीठ रोड, विद्यानगर, कोल्हापूर – ४१६००१
दूरध्वनी क्र. ०२३१-२५२१०३८, २५३१०३८,२५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com Website : www.gpkolhapur.org.in
• AICTE Permanent ID : 1-475576863 • DTE Code : 6010 • MSBTE Code : 0011 • Est. Year : 1961

जा. क्र. शातंनिको/परीक्षा विभाग/2025/309 दिनांक – 06/08/2025

## परिपत्रक –

विषय :- तिसऱ्या व पाचव्या सत्रातील (H-Scheme) विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज भरणे बाबत (R,R+RR,फक्त RR ).

तिसऱ्या व पाचव्या सत्रातील विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, हिवाळी परीक्षा **2025** चे **MPECS 2023 (H-Scheme)** परीक्षा अर्ज खालील दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Sr. no. | Activities | Filling examination forms (normal Fees) | Filling Examination forms (With Exam form fees+ late fees of Rs. 200/-) | Filling Examination forms (With Exam form fees+ Penalty Rs. 1500/-) |
|---|---|---|---|---|
| 1 | Candidate Fill | 11 August 2025 To 16 August 2025 | 17 August 2025 To 19 August 2025 | 20 August 2025 To 22 August 2025 |
| 2 | HOD Confirmation | 11 August 2025 To 17 August 2025 | 17 August 2025 To 20 August 2025 | 20 August 2025 To 23 August 2025 |

- नियमित (R) परीक्षा विद्यार्थ्यांसाठी एकूण परीक्षा शुल्क रूपये **900/-**
  (सत्र परीक्षा रुपये **700/-** + चाचणी परीक्षा रुपये **200/-**)
- नियमित **(R+4RR)** विद्यार्थ्यांसाठी एकूण परीक्षा शुल्क रूपये **1700/-**
- **4RR** च्या पुढे प्रत्येक विषयांसाठी रुपये **200/-** प्रति विषय .
- फक्त RR असलेल्या विषयासाठी रुपये **200 /-** प्रति विषय.

1) परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे.
त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या **www.gpkolhapur.ac.in** ह्या संकेत स्थळावर (Website) त्यांचे माहिती पत्रक **(E-Registration)** बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो, ई-मेल ॲड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपूर्वक वाचून गरज असल्यास दुरुस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करू शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देण्यात येतील.

P.T.O

2) आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा, तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी.

पासवर्ड विसरल्यास रुपये 100/- इतके शुल्क भरून पासवर्ड घेता येईल.

3) सर्व विद्यार्थ्यांनी विषम सत्र 2025 करीताचा परीक्षा अर्ज भरताना आपल्या विभागातील वर्गशिक्षक यांच्याशी संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

4) एकदा परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन **Save** केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत वर्ग-शिक्षक यांचे कडून बदल करून घ्यावा व त्यानुसार केलेल्या बदलाची खात्री करून सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

5) परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर, ~~परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पद्धतीने आकारण्यासाठी विद्यार्थी विभागाशी आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व~~ परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. परीक्षा अर्ज आणि मागील मार्कशीट विभागप्रमुख यांनी नेमून देण्यात आलेल्या वर्गशिक्षक यांच्याकडे कायम करणेसाठी **(confirm )** जमा करावे.

6) विद्यार्थी विभागाकडून मार्क केलेली फी भरणे बंधनकारक आहे.

वर्ग शिक्षकांनी अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

7) परीक्षा अर्ज त्रुटी तसेच पात्रता विषयी ची खातरजमा विभागाने आपल्या स्तरावरून मागील मार्क्सशिट्स तसेच विद्यार्थी हिस्ट्री पाहून करावी.

अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा.

(कॅप्टन डॉ. नि. पो. सोनजे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रत :-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३. सर्व विभागाना जाहीर करणेसाठी.
४. संस्थेच्या सांकेतिक स्थळावर (Website).